# समुद्रात पुस्तकांच्या

कविवर्य- संतोष पवार



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# समुद्रात पुस्तकांच्या

काव्यसंग्रह

संतोष रामचंद्र पवार

# समुद्रात पुस्तकांच्या

**कवी : संतोष रामचंद्र पवार**

‘शिवकृपा’ घर नं. ८४१ ,गावडे शेत, चराठे, ता. सावंतवाडी जि. सिंधुदुर्ग

सम्पर्क: व्हाट्सॅप क्र. ९९६०१७८०४४

ई मेल spawar043@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी कवीची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २ एप्रिल २०२२ (चैत्र गुढीपाडवा शके १९४४)

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- *हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.*

# *मनोगत*




साहित्य क्षेत्रातील मी एक छोटासा कवी. विज्ञान शाखेचा विद्यार्थी असूनही महाविद्यालयीन जीवनापासूनच काव्य स्फुरू लागले. लिहिलेले काही जणांना आवडू लागले.

अलीकडे सोशल मिडोया मुळे अनेक वाचकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली.  वाचकांच्या प्रतिक्रीया येत राहिल्या, तसतशी लिहिण्यास प्रेरणा मिळत राहिली..अनेक वर्तमान पत्रातून कविता प्रसिद्ध होऊ लागल्या. तसेच 'मंथन' 'नव्या युगाची कविता ' ' कविता निळया सूर्याच्या '  'काव्य सिंधू ' अशा अनेक काव्यसंग्रहातून कविता प्रसिद्ध झाल्या. माझी पत्नी सौ. संध्या व अनेकांनी मग काव्यसंग्रह प्रकाशित करण्याची सुचना केली. अखेर ई साहित्य प्रकाशन वरून काव्य संग्रह प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला.  हा काव्यसंग्रह प्रकाशित करण्यासाठी ज्यांनी प्रेरणा दिली , त्या सर्वांचे मनापासून आभार.

- आपलाच,  संतोष पवार



***जिच्यामुळे सतत लिहिण्याची प्रेरणा मिळाली***
***ती  माझी  पत्नी सौ. संध्या व मुले शुभम व अभिषेक***
***यास समर्पित .***

# अनुक्रमणिका


१.समुद्रात पुस्तकांच्या

२.प्रकाशवाटा...

३.तुला जपणार आहे...

४.ती वाट जुनी तोच रस्ता जुना...

५.चेहरे खरे...

६. नवीन सुरुवात करावी...

७.काय घेवून आलो......

८.नवरात्र (राज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त कविता )

९.गुरू

१०. पूर खोट्या आसवांचा...

११. प्रत्येक शब्द तुझा.....

१२.वाचाल तर वाचाल

१३ . तिरंगा

१४. पुन्हा पुन्हा.....

१५. बदलते जग

१६. बाबा तुम्हीच होता....

१७. स्त्रीशक्ती (अष्टाक्षरी रचना)

१८. एक प्रेम असेही ......

१९. शुभमंगल

२०. हिरव्यागार झाडासारखं....!

२१. अजून ह्रदयात माझ्या.....

२२. तो निर्णय तुझा होता....!

२३. रस्सीखेच

२४. तिरकी चाल

२५. हरवलेली स्वप्ने

२६. जीवनसाथी

२७. माळी

२८ . पुतळे

२९. धडपड

३०.आयुष्याची पायरी

३१. चार क्षणांचे सारे आयुष्य

३२. तडजोड

३३.मला माणूस आहे व्हायचे

३४.आरोप

३५.श्री गणेश (सुधाकरी अभंग)

३६. दान.....

३७. सौंदर्य

३८. असं कुठवर चालायचं?

३९. मनावेगळी लाट

४०. वहीचं शेवटचं पान

४१. दोन दिसांची नाती

४२.लॉकडाऊन

४३. गैरसमज

४४. ओझे

४५. गेले द्यायचे राहून

# १. समुद्रात पुस्तकांच्या

निघालो सफरीवर साहित्याच्या
घेतली उडी समुद्रात पुस्तकांच्या..
केला स्पर्श हळूवार कवितेला
तीनेही हसून प्रतिसाद दिला....
स्वार होऊन लाटांवर शब्दांच्या
केली दंगामस्ती समवेत त्यांच्या...
शोधले काही मोती सुविचारांचे
जपून ठेवले त्यांना ह्रदयी कायमचे....
मग फिरलो कादंबरीच्या बेटावर
पाहून शब्दवैभव ते मन नव्हते भानावर...
भेटल्या कितीक मस्त्यकन्या आणि अप्सरा
पाहून तयांना मन हे धावे सैरावैरा.....
गुप्तहेरांच्या कथांचे कोडे सुटता सुटेना
रहस्यमय गुम्फेतून वाट परतीची मिळेना.....
लघुकथा, नाट्यछटा, नाटके कितीक
समुद्रात पुस्तकांच्या मी मुसाफिर एक.....

## 2.प्रकाशवाटा...

प्रकाश वाटा चालताना,
भिती नसावी अंधाराची....
सुर्य जरी मावळला तरी,
वाट पहावी चांदण्यांची....
दिसला जरी कवडसा ,
साद तया घालावी मैत्रीची....
सोबतीने त्याच्या चालताना,
इच्छा असावी तिमिर भेदण्याची....
प्रकाश वाटा चालताना,
घ्यावी किरणे प्रकाशाची.......
घेता घेता एक दिवस,
किरणे बनावी ता-याची.....

-

## ३.तुला जपणार आहे...

माहीत नाही, सोबत तू आहेस किती वेळ,
तु पण जोवर आहेस सोबत तोवर.....
.......तुला जपणार आहे!
माहीत नाही किती होईन श्रीमंत मी,
पण मनाच्या श्रीमंतीने......
.......तुला जपणार आहे!
माहीत नाही वाटेत किती आहेत काटे ,
पण फुलांचा वर्षाव होईपर्यंत.......
........तुला जपणार आहे!
माहीत नाही किती आहे,आयुष्य माझे,
पण शेवटच्या श्वासापर्यंत..
..तुला जपणार आहे!

-

# ४.ती वाट जुनी तोच रस्ता जुना...

आज अवचीत समोर आली
ती वाट जुनी, तोच रस्ता जुना.... !
आठवणींच्या पायगुड्या पांघरलेला
चालावे की चालू नये त्यावर
तोच समोर उभा प्रश्न जुना... !
भावनांच्या वृक्षवेली दुतर्फा बहरलेल्या
सावलीत त्यांच्या थांबावे की नाही
होई मनात खळबळ पुन्हा.... !
दिसत होत्या त्यावर काही पाऊलखुणा
मागोवा त्यांचा घ्यावा की घेऊ नये
पावले मागे पुढे होती पुन्हा पुन्हा... !!

-

# ५.चेहरे खरे...

चेहरे खरे वाटले म्हणून,
घेतला खांद्यावर हात त्यांचा....
मलाच खांदा देण्याच्या तयारीत,
दिसला कसा हात त्यांचा.......

शोधत होतो मी खरा चेहरा,
दुनियेच्या या बाजारात ......
माहीतच नव्हते मला परंतु ,
तो असतो मुखवट्या आत.......

मुखवटा फाडण्यास जेव्हा,
मी सरसावली माझी तलवार.....
खुपसला पाठीत खंजीर त्यांनी ,
पाठीमागून केला वार....

समोरुन लढण्याचे जरी,
साहस माझ्यात आले आहे....
मागून वार करणाऱ्यांचे,
उरात भय दाटले आहे....

-

## ६. नवीन सुरुवात करावी...

चूक भूल ती झाली गेली ,
कदापी लक्षात न घ्यावी...
जेथे संपले मार्ग तेथूनच,
नवीन एक सुरुवात करावी.....

एकेक पायरी चढताना,
घसरला कधी पाय जरी ........
निराश न होता पुढेच जावे ,
घेऊन अनुभवांची नवी शिदोरी..........

काटे कुटे जर मार्गातून येती,
थोडावेळ विश्रांती मग घ्यावी ......
काट्यातील सुमनांचा वेध घेऊन,
वाट यशाची पुन्हा शोधावी.........

## ७.काय घेवून आलो……

काय घेवून आलो आपण,
काय न्यायचे आहे….
देह घेवून आलो होतो,
रिकामे जायचे आहे……!
वळलेल्या  इवल्याशा मुठी
आलो होतो घेवून…..
जाताना जायचे आहे
दोन्ही हात पसरून……!
द्यावे की घ्यावे दोन करांनी,
आपणच ठरवायचे आहे…..
अंगावर नव्हते वस्त्र,
उघडाच होता देह…..
जातानाही एकाच वस्त्राने,
झाकायचा आहे देह……!
झाकला का  कुणा गरीबाचा देह ?
स्वत:लाच विचारायचे आहे……..
दामडी देखील नव्हती,
आलो जेंव्हा इथे.....
कुबेरासम धन कमाविले
जाताना ठेवावे कुठे?...!
कुणी भुकेला तृप्त केला,
आपणच ठरवायचे आहे..........

## ८.नवरात्र

**(राज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त कविता)**

नऊ रुपात सजली
देवी ही नवरात्रीची...
दर्शन घेता तिचे
तृप्ती जाहली भक्तांची ...

देवी तू गं 'आई भवानी'
शिवबाचा गं तू आधार....
स्वराज्याचे स्वप्न त्यांचे
तूच केले गं साकार....

महिषासुर मर्दिनी
केले दुष्ट निर्दालन....
असत्याला दूर केले
सत्याचे केले पालन ....

देवी शारदेचे रूप
जणू आरसा विद्येचा....
ध्यास तुझा घेता देवी
मिले प्रसाद ज्ञानाचा ....

अन्नपूर्णा होउन तू
तृप्त करीशी उदरा
तुझ्या भक्तीनेच माते
बळीराजा सुखी खरा....

रूप जणू तुझे देवी
स्त्री शक्तीचा जागर ....
अबलांची शक्ती तूच
तूच त्यांचा हो आधार ....

गाथा तुझी गाता देवी
शब्द सारे रिते होती ....
कृपा तुझी राहो सदा
मग नाही आम्हा भीती....

## १.गुरू

गुरू आहे दीपस्तंभ
तोच दावी खरा मार्ग
वंदू त्याला मनामध्ये
होई जीवन हे स्वर्ग

ज्ञान देण्या तुम्हा आम्हा
कधी होई कठोर तो
क्रोध जरी मुखावरी
मनी प्रेम निर्झर तो

त्याने दिली शिकवण
युक्ती जीवन जगण्या
कर्तव्य करण्या सज्ज
शिका सुखही त्यागण्या

संकटे येता समोर
होई त्याचेच स्मरण
लढण्यास वादळाशी
बाहुना येई स्फुरण

ईश्वराचे दर्शन ते
नाहीच झाले कधीही
पहा आंतर  चक्षुंनी
दिसे देव गुरुरूपी

भोवताली त्याची रूपे
विश्वव्यापी तो विराट
अणुरेणू तोच आहे
तोच ब्रह्मांडाची वीट

# १०. पूर खोट्या आसवांचा...

नको पाडू पाऊस,खोट्या आश्वासनांचा
नकोस आणू पूर आता, खोट्या आसवांचा

जोडले होते हात, तु सत्तेवर येण्यासाठी
केली होती विनंती, मतदान करण्यासाठी
निवडून येताच कसा, विसर पडला वचनांचा?

विरोधकांना संपविण्यात, गेली पाच वर्षे
प्रश्न नाही सोडविले, जे राहीले वर्षानुवर्षे
श्रीमंतांची केली चिंता, नाही सुटला प्रश्न दीनांचा

वाटले होते 'दिवस चांगले', येतील पुन्हा परतून
काळ आधीचा बरा होता, आता वाटते मनापासून
वर्षाव का केला होता, मोठमोठ्या घोषणांचा ?

पुन्हा तु येशील आता, खोटी प्रलोभने घेऊन
भिक मागशील सत्तेची, पुन्हा अगतिक होऊन
निवडून कसे द्यावे पुन्हा, अपमान हा लोकशाहीचा

-

## ११. प्रत्येक शब्द तुझा.....

प्रत्येक शब्द तुझा,
जसे सागरातील मोती
शब्दांच्या राशीतून वेचावे किती?.....
प्रत्येक शब्द तुझा,
मी पांघरतो अंगावरती
उब त्यांची घेतो निशब्द राती....
प्रत्येक शब्द तुझा, कोमल कुसुम माझ्यासाठी
मंद सुवास घेतो जगण्याच्या आधारासाठी,,,,
शब्द जेव्हा तुझ्या ओठातून येतो
त्या निरागस सौंदर्याने, मी भारावून जातो....

-

## १२.वाचाल तर वाचाल

कुणी वाचत नाही, हीच आजची खंत
जो वाचेल पुस्तक,तोच खरा श्रीमंत

साहित्याचे विविध रंग, करिती जीवन रंगीत
वाचन करीता पुस्तकांचे, जीवन सुरेल संगीत

कथा , कविता कादंबरी, शिण मनाचा घालवी
वाचन करीता त्यांचे, भावनांना फुटे पालवी

प्रवास वर्णने वाचताना, मनसोक्त फिरून यावे
नवनवीन अनुभवांनी जीवन समृद्द व्हावे

वाचनाने चित्तशुद्धी, वाचनाने ज्ञान समृद्धी
वाचन करता होई , तल्लख आपली बुद्धी

वेळ रिकामा मिळता, हाती असावे पुस्तक
चौफेर वाचन करूनी, तीक्ष्ण करावे मस्तक

-

## १३. तिरंगा

माझ्या देशाचा तिरंगा
तीन रंगात रंगला
चक्र अशोकाचे छान
सा-या विश्वात शोभला

जणू सुर्य तो नभात
रंग केशरी दिसतो
तेज तयाचे पहाता
शत्रू भयाने कापतो

श्वेत रंग मधोमध
जणू प्रतीक शांतीचे
मन शांत होते पहा
घेता दर्शन तयाचे

दिसे हिरव्या रंगात
शेती शिवार मोकळे
माझा शेतकरी राजा
रात्रंदिन घाम गाळे

उंच मानेने तो उभा
त्याचे लक्ष सीमेवर
त्याला चुकवून कुणी
नाही येऊ शकणार

ह्रदयात ठेवा  याला
जपा त्याला हळुवार
रक्त सांडले  तरीही
नका  ठेऊ भुमीवर

मनी  असुदे   सदैव
अभिमान तिरंग्याचा
शहिदांनी लिहिला हो
भव्य  ईतिहास याचा

# १४. पुन्हा पुन्हा.....

सौंदर्य तुझे पुन्हा पुन्हा ,मी न्याहाळतो आहे
थांबणाऱ्या श्वासांना,पुन्हा पुन्हा सावरतो आहे

मी आहे अवनीवरी, की स्वर्गात आहे मी
पहाताना तुझ्या कडे,स्वतःला चाचपडतो आहे

ते कुंतल मोकळे, गहिरा नयनात असे भाव
कृष्ण रंगाचे सौंदर्य, नव्यानेच पाहतो आहे

गो-या गालावर खळी, जणू गुलाबाची कळी
अल्लडपणावर तीच्या मी,उधळले काव्य आहे

किती साठवावे मनात या,तव सौंदर्याचे नजारे
भावनांच्या नदीने आता, तीर ओलांडला आहे

-

# १५. बदलते जग

थोड्या थोड्या दिवसांनी
जग हे बदलत राही....
असेन किंवा नसेन मी,
खेळ हा दिवस रात्रीचा
कधीही संपणार नाही.....
लिहिता लिहिता एक दिवस
थकतील हातांची बोटे
लेखणीस मात्र नसेल विश्रांती
ती लिहितच राहील बदलून बोटे
साहित्याचा अखंड प्रवास हा
कधीही संपणार नाही....

-

# १६. बाबा तुम्हीच होता....

संसार सागराच्या प्रवाहात, वादळ, वारे सोसणारे
............ बाबा तुम्हीच होता

अनेक संकटे झेलूनही, आम्हाला घडविणारे ............
बाबा तुम्हीच होता

आम्ही शिकून मोठे व्हावे म्हणून, सायकलच्या नळीवरुन,
शाळेत सोडणारे...
.......................बाबा तुम्हीच होता

स्वतः कर्जाच्या ओझ्याखाली असूनही, आम्हाला सुखी पहाण्यासाठी,
कष्ट उपसणारे...
..........................बाबा तुम्हीच होता

चूक होताच आमच्या हातून काही, कठोर झालात तरी, पुन्हा मृदू होऊन
मायेने कुरवाळणारे...
...........................बाबा तुम्हीच होता

यशाचे शिखर गाठता आम्ही, आनंदाश्रू नयनात तरळत ठेवून
तोंडभरून कौतुक करणारे....
.........................बाबा तुम्हीच होता

तुमची सेवा करता करता, समाधान आम्हास लाभले बहूत
या जीवनात हे भाग्य देणारे....
..........................बाबा तुम्हीच होता

## १७. स्त्रीशक्ती  (अष्टाक्षरी रचना)

तीच आहे जन्मदात्री
तीच्या हाती वंशवृक्ष
तीच विश्वाची निर्माती
तीच्याविना सारे रुक्ष

स्त्रीशक्तीचा जागर ती
नसे कुणी ती अबला
अदिशक्ती तीच्या ठायी
कमी लेखू नये तीला

आभाळाची उंची तीची
सागराची खोली असे
तीचे मन जाणण्या रे
उभा जन्म कमी भासे

त्यागमुर्ती होऊनिया
सर्वांसाठी त्याग करी
दु:ख बाजूला सारून
हास्य  मुखातून येई

आई, बाप, पती, मुले
सा-यांचाच ती आधार
लेक,ताई,पत्नी,आई
कैक  रूपात वावर

माथा ठेवतो चरणी
घेई स्विकार करुनी
आदिशक्ती,आदिमाया
तु विश्व वरदायिनी

## १८. एक प्रेम असेही ......

पाहिला होता मी 'डी पी' वर,सुंदर चेहरा तीचा
'मेसेज'वर सुरू झाला मग,खेळ खाणाखुणांचा....
भावल्या मला,तीच्या अंतरीच्या कोमल भावना
हरवून बसलो काळीज,तिच्या वीना मज करमेना.....
सुंदर चेहऱ्यामागे तीच्या, मनही सुंदर असावे
ठरविले होते मनात मी,तीला रात्रंदिवस जपावे.......
मात्र 'स्टेटस' वर तीच्या,दिसता नविन चेहरा
तुटून पडला माझ्या,ह्रदयातील प्रेमाचा तारा......
प्रेमाने भरलेले ह्रदय हे,तेव्हाच तुटून पडले
जेव्हा साखर पुड्याचे फोटो, तीने 'अपलोड' केले......
प्रेमकहाणी ही माझी,अशी होती ‘आगळी वेगळी’
सुरू होता होतानाच,तीने वाट पकडली वेगळी........!!

-

# १९. शुभमंगल

शुभमंगल होता दोघांचे,
गाठ ती जन्माची पडे....
काळजी घ्यावी दोघांनी,
पाऊल पडे ना वाकडे.....
शब्दाने शब्द वाढत जाई,
वितंडवादाचे घेई रुप......
ओठात असावी साखर,
प्रेमाचे बोलणे असावे खूप...
मनी संशय कधी  येता,
खात्री करून पहावे आधी......
उगा शंका व्यक्त करता,
पश्चात्ताप होई कधी कधी.....
एकमेका समजून घ्यावे,
म्हणू नये ‘मीच मोठा’......
विवेकी त्या विचारांचा,
करावा डोक्यात साठा......
संसाररूपी रथाची चाके,
नेहमी असावी समांतर....
दिशा त्यांची बदलता,
भरकटत जाई संसार....
मनी शिरून एकमेकांच्या,
जाणावे अंतरंगांचे रंग....
मित्र समजावे एकमेकां,
होऊ न द्यावा मैत्रीचा भंग.....

# २०. हिरव्यागार झाडासारखं....!

फुलावं, बहरावं, सावलीसाठी पसरावं
हिरव्यागार झाडासारखं....!
पशुपक्ष्यांना जगवावं,अंगाखांद्यावर नाचवावं
हिरव्यागार झाडासारखं....!
वादळाशी झुंजावं, विजेला आपलसं करावं
हिरव्यागार झाडासारखं....!
कुणी कितीही सतावलं,त्याला माफ करावं
हिरव्यागार झाडासारखं.....!
धुरानं जीव कोंडला तरी,प्राणवायूचं दान द्यावं
हिरव्यागार झाडासारखं.....!
देण्यासाठी जगावं, घेण्याचं नाव नसावं
हिरव्यागार झाडासारखं......!!

-

## २१. अजून ह्रदयात माझ्या.....

जपली आहे आठवण तुझी,
अजून ह्रदयात माझ्या....
वळून पाहतानाची नजर तुझी,
अजून ह्रदयात माझ्या....
तु माळला होता कधी,
वेणीत शुभ्र मोगरा...
सुगंध अजून दरवळतो त्याचा,
अजून ह्रदयात माझ्या.....
तुला आवरत नव्हती,
ती अवखळ बटा केसांची.....
तीचा स्पर्श घेऊन येणारा वारा,
अजून ह्रदयात माझ्या....
सोबत चालता चालता,
वाट तुझी बदलली जरी....
तुझ्या पावलांचे कोरलेले ठसे,
अजून ह्रदयात माझ्या....

-

# २२. तो निर्णय तुझा होता....!

मला सोडून जाण्याचा,
तो निर्णय तुझा होता....!
गुंतलेले हात सोडविण्याचा,तो निर्णय तुझा होता....!!

परिस्थिती विपरीत जरी,
लढाऊ माझा बाणा होता...!
लढण्याआधीच हरण्याचा, तो निर्णय तुझा होता...!!

ढासळत होतीस तु जेव्हा,
माझा भक्कम आधार होता...!
आधारच सोडून जाण्याचा, तो निर्णय तुझा होता...!!

आसवांनी भिजलेल्या रात्री,
तुला माझाच प्रकाश होता...!
मलाच विझवून टाकण्याचा, तो निर्णय तुझा होता....!!

-

# २३. रस्सीखेच

नाहीत दुसरे कुणीही,
आपलेच इथे खेळतात रस्सीखेच !
वागणे पाहून त्यांचे,
मनास आपल्याच लागे ठेच !!
आपण समजतो त्यांना,
ते आहेत आपलेच भाऊबंद!
त्यांच्या मनाची दारे मात्र,
असतात आपल्यासाठी बंद !!
संपत्तीच्या रस्सीचे टोक,
असते नेहमीच त्यांच्या हातात !
वापरून युक्त्या प्रयुक्त्या,
स्पर्धा त्याला ओढण्याची करतात !!
पण माहीत नसते त्यांना,
जरी खेचली त्यांनी रस्सी !
नात्यांची दोरी तुटताच,
परक्यांचीच होत असे सरशी !!

-

# २४. तिरकी चाल

तिरक्या चालीने चालणाऱ्या जगात या,
मी सरळ मार्गाने चालत गेलो...
ओळखता न आल्याने चाल त्यांची,
मीच कोंडीत सापडत गेलो....
माहीतच नव्हते मला,
'हातचे' काही राखायचे असते
आपले समजून प्रत्येकाजवळ,
मन 'मोकळे' करीत गेलो....
त्यांनी सांगितले ते सारे काही
'खरे असावे' समजत गेलो....
त्यांनी मात्र लपविले होते,
चेहरे आपले पडद्याआड
पडद्यासमोर घडणारे सारे,
खरेच मी समजत गेलो.....
योग्य संधी साधून त्यांनी,
जेव्हा तिरका वार केला
जखमी झालो तरीही मी.
सरळ चालीने चालत राहीलो.....
वार त्यांचे झेलतानाही
त्यांनाच 'आपले' समजत राहीलो.....
मृत्यूच्या दारात पोहोचलो तरी
त्यांनाच मुजरा करीत राहीलो......

-

# २५. हरवलेली स्वप्ने

स्वप्नांना गवसणी घालण्यापुर्वीच,
ती हरवून गेली...
आयुष्य वेचले त्यांना शोधण्यासाठी,
संकटांच्या धुक्यात अदृष्य झाली...
आले काही क्षण असेही,
वाटले स्वप्ने साकार झाली
पण पुर्णत्वास जाण्यापूर्वीच,
ती कशी ढासळत गेली....
मी होतो एक मुसाफिर,
आनंद लुटत चाललेला
दुःखाने मात्र मनाची,
एक बाजू पोखरून गेली.....
अंधा-या रात्री देखील,
मी पाहिली स्वप्ने प्रकाशवाटेची
गाढ झोपेत असता,
का अचानक जाग आली?......
वाटला करावा जेव्हा,हिशोब जमाखर्चाचा
बेरीज काही जुळली नाही,
वजाबाकीने तीवर मात केली....
तरीही वाटते मनास,
स्वप्ने पहाण्यात आहे मजा
हरवून गेली तरीही,
खुप काही  शिकवून गेली.....
-

# २६. जीवनसाथी

तु माझी जीवनसाथी, तुच सहचारिणी
संसाराच्या वाटेवरील,तुच जीवन संगिनी

रूसून बसली असता, तु अचानक हसावे
जणू कोमेजल्या फुलाने, पुन्हा उमलून यावे
लटक्या रागाची तुझ्या,असे वेगळीच कहाणी

वादळाशी झुंज देण्या,तूच देशी मज साथ
बुडणा-या नौकेची माझ्या,तुच सांभाळशी पात
आदिमाया आदिशक्ती, तुच संकटनाशिनी

उदर हे तृप्त केले, रोज नव्या पक्वानांनी
पाककलेची तुझ्या, पडली मनास मोहिनी
मिठासम महत्त्व तुझे,तुजविण हे जीवन अळणी

वादविवाद झाले कितीही,पुन्हा सांभाळून घेशी
साखरेत घोळलेल्या शब्दांनी,होई तुझीच सरशी
माझ्या छोट्याशा राज्याची, तुच असे ग राणी

# २७. माळी

फुलवीतो बाग मी मुलांची
ज्ञानाचे खतपाणी घालून
बहरुन येताच फुले रंगीत
मन हे माझे जाई आनंदून

काही फुले असती नाजूक
स्पर्श त्यांना करतो जपून
मायेने जवळ घेताच त्यांना
त्यांची कळी दिसते खुलून

काही फुलांना असती काटे
त्यांना पाहतो थोडे दुरून
नजरेच्या केवळ जादूने माझ्या
त्यांचे काटेही पडती गळून

काही असतात गुदमरलेली
परिस्थितीने गेलेली गंजून
हलकेच त्यावर फुंकर घालता
घेतात श्वास ती भरभरून

मुलेच माझ्या बागेची फुले
जीवन अंगणी येतात फुलून
चिंतेने कितीही ग्रासलो तरी
पाहून त्यांना जातो खुलून

# २८ . पुतळे

एकदा पुतळेच बोलू लागले
अचानक एकमेकांशी,
जीवंत होऊन...
अन् भांडू लागले श्रेष्ठत्वाच्या उंचीवरून....
एक म्हणे ''मी' आहे जगातील
सर्वात उंच पुतळा
तुलनाच होऊ शकत नाही,
कुणाची माझ्या उंचीशी'
दुसरा म्हणे 'तुझ्या पेक्षा माझी उंची फक्त दोनच बोटे कमी
पण तुझ्या पेक्षा कर्तृत्वाने कितीतरी उंच आहे मी'
'मी जीवंत असताना भारतीय स्वातंत्र्यलढ्यात मीच होतो पुढे,
मी नसतो तर वळवळले असते पारतंत्र्याचे किडे'....
पहिला म्हणे, मी देखील दलित समाजाला सोडविले आहे
गुलामगिरी तून
नाहीतर खितपत पडले असते सारे जातिभेदाच्या
चिखलातून.....
इतक्यात त्यांचे बोलणे ऐकणारा एक वयस्कर पुतळा आला
धावून,
नम्रपणे बोलू लागला, कमरेत थोडासा लवून......
'अरे, तुम्ही असे कधी बोलत नव्हता,
इथे आल्यापासून
'मला वाटते, कुणी शिरला असेल माणूस तुमच्या अंगातून....

'ही माणसेच भांडतात एकमेकांशी, आपल्यामध्ये स्पर्धा निर्माण करुन
अन् मग करतात आमची विटंबना
चिखल किंवा शेण फासून.....
नाहीतरी..... उन, वारा, पाऊस
अंगावर घेत आपण उभे असतो रात्रंदिवस
त्या महापुरुषांच्या विचारांचे प्रतिक म्हणून...
'त्यांनी' खाल्ल्या अनेक खस्ता समाजासाठी,
आपला जन्मच मुळी त्यांचे विचार जागविण्यासाठी....
'त्यांच्या' जयंती दिनी आमचा हारतु-यांनी सन्मान
इतरवेळी त्यांना आमची होतच नाही आठवण....
म्हणूनच म्हणतो,
'करण्यापेक्षा स्पर्धा उंचीवरून,
उंच होऊ विचारांची उंची वाढवून...
उंच होऊ समानतेची शिकवण देऊन'...

-

# २९. धडपड

सुखस्वप्नांच्या दुलईत तु, राहू नको रे झोपून
सारेच काही मिळवायचे आहे,येथे धडपड करुन

हे जीवन वाटले जरी, सुंदर फुलांचा गालिचा
त्या फुलांच्या खाली, वावर आहे काट्यांचा
मार्ग तुला शोधायचा आहे, ते काटे चुकवून

हे जीवन सजविण्या,जरी तु रंगीत स्वप्न पाहिले
ढासळते क्षणात,एक पाऊल जरी वाकडे पडले
रचायचे आहेत स्वप्नांचे मनोरे,तुला तोल सावरून

जरी दिसती सुंदर, उगवते तारे नभांगणाचे
भास्करास देखील येथे,वेध लागती ग्रहणाचे
सुटायचे आहे तुला,राहू केतूच्या विळख्यातून

नाहीच कोणताही मार्ग, येथे सरळ जाण्याचा
वळणा वळणाचा मार्ग हा,असे द-याखो-यांचा
यशोशिखर गाठायचे आहे,अनंत संकटे झेलून

-

## ३०.आयुष्याची पायरी

आयुष्याची पायरी। जपून चढावी।
साथ ती सोडावी। दुर्गुणांची।।

प्रत्येक पायरीवर। यश शोधावे।
सोडून ते द्यावे । अपयश मागे।।

साथ सज्जनांची । सोबत घ्यावी।
एकमेका द्यावी । विचारांची शिदोरी।।

प्रत्येक पायरी । चढावी क्रमाने।
नको घाईने । पायरी चुकविणे।।

पायरी पायरी चढता । ध्येय गाठावे |
सार्थक करावे । आयुष्य हे ।।

-

# ३१. चार क्षणांचे सारे आयुष्य

चार क्षणांचे सारे आयुष्य
जगून घ्यावे आपण आनंदाने
सुगंध मनात घ्यावे भरून
कोमेजून जाण्याआधी फुलाने

वेळ पहा निसटून निघाली
वाटते, बरेच काही राहून गेले
बालपण,तारुण्य वेगे गेले
पहाता पहाता प्रौढपण आले

मुलांना आधार दिला कधी
आता त्यांचाच आधार घेतो
ते चार क्षण निघून गेले
राहिले चार क्षणांचे जगणे

-

## ३२. तडजोड

जीवन हे जगताना,
तडजोड ही करावीच लागते...
मनाविरुद्ध घडताना देखील,
परिस्थितीला जुळवून घ्यावे लागते...
पती, पत्नी, मुले, मित्र,
मनमानी वागले तरी,
आपण गप्प बसावे लागते....
का उगा त्रागा करावा,
का कुणा समज द्यावा,
मन:शांती  ढळण्या ऐवजी,
जे घडते ते पहात बसावे....
आपण कितीही समजावले तरी,
स्वभाव काही बदलत नाही...
रागाने आपण लाल होतो
समोरच्याला फरक पडत नाही...
उगा रक्तदाब वाढविण्याऐवजी,
डोक्यावर बर्फ ठेवून जगावे....

-

# ३३.मला माणूस आहे व्हायचे

हार फुलांचे गळा घालून...
नाहीच कुणी मला नेता व्हायचे
केवळ मला माणूस आहे व्हायचे
सत्काराच्या शब्दफुलांनी...
नाहीच मला गर्वाने फुगायचे
केवळ मला माणूस आहे व्हायचे
खोटी प्रलोभने दाखवून...
नाहीच मला प्रेम मिळवायचे
केवळ मला माणूस आहे व्हायचे
खुप प्रसिद्धी मिळवून...
नाहीच मला माणसात श्रेष्ठ ठरायचे
केवळ मला माणूस आहे व्हायचे
निस्वार्थ भावनेने...
समाज सेवेस आहे मला वहायचे
केवळ मला माणूस आहे व्हायचे

-

## ३४.आरोप

'आरोप' करुन माझ्यावर, ती दूर निघून गेली...
माझ्या नाजूक ह्रदयावर, जखमांची छाप सोडून गेली..
शब्द बाण सोडून ती, मला घायाळ करून गेली...
आरोपांचे ओझे देऊन मला, स्वतः निर्दोष होऊन गेली....
सुख दु:खाच्या खेळात या, माझ्यावर चाल करुन गेली....
नजरेच्च्या एकाच तडाख्याने, जीवन नौका बुडवून गेली...
मात्र आरोपांचे तीर सोडताना, ती असे का वागून गेली ?...
नजरेस नजर देताच मी, का माझी नजर चुकवून गेली ?...

## ३५.श्री गणेश (सुधाकरी अभंग रचना)

ओंकाराचे रुप । विद्येची देवता।
तुझे गुण गाता । समाधान ॥
कार्यारंभी तुझे । केल्याने पुजन।
संकट हरण । सदोदीत ॥
तु बल्लाळेश्वर। तुच लंबोदर।
तुच भालचंद्र। श्री गणेश ॥
वंदन तुजला। देवही करीती।
दर्शनाने तुझ्या।धन्य होती ॥
तुझ्या आगमने। आनंदित सारे
स्वागतास सारे। आतुरले ॥
पाहूनी आरास। मनास हुरूप।
गोड तुझे रुप। मनोहर ॥
निरोपाची वेळ। येतसे समीप।
अंतरीचे दिप। मंद होती ॥

-

## ३६. दान.....

जाता जाता या जगाला,
असे काही देऊन जावे....
प्रत्येकाच्या आठवणीत,
मरावे परी किर्ती रुपे उरावे...

स्वतः साठी जगता जगता,
काही क्षण असेही जगावे....
आधार ज्यांचा निघून गेला,
त्यांच्या साठी आधार बनावे....

जीवनाच्या रुक्ष वाळवंटात,
शोधावे सुखाचे निर्मळ तळे....
स्वतः जलपान करता करता,
विसरू नये त्यांना,जे तहानले....

वाट जीवनाची चालता चालता
सावली देणारे वृक्ष शोधावे....
आपण सावलीत थांबता थांबता
इतरांनाही सावलीत घ्यावे....

-

## ३७. सौंदर्य

बाह्य रुपाचे सौंदर्य । चार दिवसांचे ।
शुद्ध  विचारांचे । सौंदर्य हवे ।।
वाचाळ वाणी । सौंदर्य घालवी ।
योग्य चालवावी । जिव्हा सदा ।।
नको नुसतेच । चेहरा सजविणे ।
रहावे मनाने । सुंदर सदा ।।
वस्त्रांनी जरी । देह सजविला ।
चारीत्र्याने त्याला । शोभा येई ।।
पहावे आरशात । मनाला एकदा ।
विचार सुंदरता । वाढवावी ।।
चिखलात उगवते । कमल पुष्प ।
सुंदर ते रुप । तरीही त्याचे ।।
सुंदर निसर्ग । सुंदर त्याचे रुप ।
शिकवतो खूप । सौंदर्याचे धडे ।।

-

# ३८. असं कुठवर चालायचं?

असत्याच्या टोकदार शस्त्रांनी, सत्याला टोचत रहायचं
असं कुठवर चालायचं?
अन्यायाच्या राकट हातांनी, न्यायाचं नरडं घोटायचं
असं कुठवर चालायचं?
अबलेच्या नाजूक देहाला, वासनेच्या पावली चिरडायचं
असं कुठवर चालायचं?
उंच महालाच्या खाली, गरीबांनी झोपडीत रहायचं
असं कुठवर चालायचं?
श्रीमंतांनी न्यायदेवतेला, आपल्याच मुठीत ठेवायचं
असं कुठवर चालायचं?
जीवंत देहात जोवर, मेलेल्या मनांनी रहायचं
हे असंच चालायचं......

-

# ३९. मनावेगळी लाट

सारेच मनासारखे घडत असता,
येतेच मग मनावेगळी लाट...
कमावलेले मोती हातातून निसटून,
धरतात मग रेतीसोबतची वाट....
विषण्णपणे पहाणे त्याकडे,
एवढेच आपल्या हाती असते...
त्यातही तोल सावरला नाही तर,
पायाखालची वाळू निसटते...
सा-याच लाटा आपल्या नसतात,
याची नेहमीच ठेवावी जाण....
मनावेगळ्या लाटेवर जो होईल स्वार,
त्यालाच जगी मिळे बहुमान....

-

# ४०. वहीचं शेवटचं पान

वहीचं शेवटचं पान, तसं काही खास नसतं
कुणी ते वाचावं, असही कधी वाटत नसतं...
मात्र त्या पानावर असतात, काही गोष्टी खास
रेघोट्यातून दडलेली असतात, गुपिते हमखास...
काही पाने नंतर, जातात रद्दीत मिसळून
काही मात्र ठेवली जातात, मनात जपून...
जपून ठेवलेली ती पाने कधीतरी उघडतात
हळूच मग एकटीच भूतकाळात फिरुन येतात...

-

# ४१. दोन दिसांची नाती

सरणावर निजलेल्या 'त्याला',
सारेच नमस्कार करीत होते...
जीवंतपणी लाथाडले ज्यांनी,
ते देखील त्यात सामिल होते...

पती पत्नी भाऊ बहिण,
धाय मोकलून रडत होते...
जीवंतपणी ज्यांनी त्याला,
अडगळीत  ठेवले होते....

देणेकरीही जवळ येऊन,
चरणस्पर्श करीत होते....
जीवंतपणी ज्यांनी त्याला,
लांबून नमस्कार केले होते...

जीवंतपणी ज्यांनी त्याला,
पाण्यासाठी रडविले होते...
तेच आता त्याच्या साठी,
गंगाजल शोधीत होते....

दोन दिसांची नाती सारी,
दोन दिसांचे दु:ख असते...
आयुष्याची सोबत सारी,
सरणाजवळ येऊन संपते...     -

# ४२.  लॉकडाऊन

एकदा मन माझे गेले,विचारांनी तुडुंब भरुन
विचारच उतरु लागले रस्त्यावर एकमेकांशी वाद करून...

मनाला समजावण्याचा मी खुप केला प्रयत्न
पण निष्फळ गेले माझे सारेच यत्न...

तेव्हा शेवटचा उपाय म्हणून मी केले मनालाच लॉकडाऊन
बंद केले सर्व दरवाजे मोठमोठी कुलुपे लाऊन...

अचानक केलेल्या लॉकडाऊन  मुळे थांबली विचारांची गती
सारा गोंधळ शांत झाला,घेऊ लागले मन विश्रांती..

मनाच्या बाहेरील विचार थांबले बाहेरच
अन् आतील विचारांनी घेतले दार लावून...

थोडेसे डोकावून पाहिले नंतर, मनाच्या आत आणि बाहेर
मागोवा घेत निघालो, विचारांच्या पाठलागावर...
बाहेर सुरु होते चिंतन, मुलाच्या शिक्षणाचे, मुलीच्या लग्नाचे
अन् पत्नीच्या   आजारपणाचे....
अन् आतमध्ये सुरु होते द्वंद्व विचारांचे , आर्थिक नियोजनाचे...
स्वतः चेच आरोग्य सांभाळण्याचे
मधुमेह, रक्तदाब आणि इतर आजारांसोबत लढण्याचे.....

आता मात्र आतील व बाहेरील विचार झाले होते वेगळे
भेटूच शकत नव्हते एकमेकास लाकडाऊनमुळे...

आतापर्यंत मनामध्ये वाढले होते विचारांचे प्रदुषण....
लाॅकडाऊनमुळे शुद्ध झाले होते मनाचे पर्यावरण...

माझी तब्येत सुधारली होती, केल्याने लॉकडाऊन
शुगर लेव्हल कमी,बी. पी.होता ना ॅर्मल, गेलो आनंदाने भरुन...

त्याच आनंदात 'हि'ला म्हणालो, सोडूनी सा-या संसारी चिंता
दे पाहू गरम गरम भजी आणि वाफाळलेला चहा आता...

-

## ४३. गैरसमज

समज आज मनाला
इतकीच द्यायची आहे
गैरसमजाच्या वादळापासून
तुला दूर रहायचे आहे

बरेच आहेत इथे
आभासी जग निर्माण करणारे
वास्तवाचे भान तुला
नेहमीच ठेवायचे आहे

कानगोष्टी ऐकताना
होत नसते ओळख सत्याची
डोळे उघडे ठेवूनच
तुला जगाकडे पहायचे आहे

खरे सोने झाकून
खोटेच दागिने विकतात इथे
ओळख ख-या सोन्याची
तुला बुद्धीनेच करायची आहे

-

# ४४ . ओझे

नको असलेल्या गोष्टींचे
मनावर फार झाले ओझे
सारेच कसे फोल ठरले
दूर सारण्याचे यत्न माझे

जितके दूर सारावे त्यांना
पुन्हा येऊन मानेवर बसती
मनाच्या भयाण पोकळीत
आज काल त्यांचीच वस्ती

त्या कटू आठवांची पोळी
लोंबकळत आहेत ह्रदयाशी
रोज पोखरून काढते आहे
विचारांची गांधील माशी

आता सवयच झाली आहे
नको असलेल्या गोष्टींची
ठरवले आहे,टाळायची नाही
यापुढे कधीच सोबत त्यांची

## 45. गेले द्यायचे राहून

आजवर घेतले खूप काही
द्यायचे मात्र गेले राहून...
उपकारांची यादी लांबत गेली
कृतज्ञता वहायची गेली राहून....
माय पित्याचे प्रेम घेतले
परतफेड करायची गेली राहून....
गुरूजनांनी आदर्श दिला
गुरूदक्षिणा द्यायची गेली राहून....
निसर्गाने श्वास दिला
निसर्ग जपायचे गेले राहून....
विज्ञानाने आराम दिला
अभार मानायचे गेले राहून...
देणारे हात अनेक भेटले
ते हात मागायचे गेले राहून....

चंद्र, फुले, मृग, तारे येती
जसे धरित्रीवर
तशी कविता रिझवित येते
ई साहित्यावर

खुप साऱ्या कविता वाचण्यासाठी
आपल्या सुंदर कवितांचा आनंद
इतरांना देण्यासाठी

ई-काव्यमैफ़ल

www.esahity.com

esahity@gmail.com

9987737237(Whatsapp)

-